**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.10 No.3** **Jan – Feb 2023**

# भारतीय स्त्री - जिवनाची वाटचाल व स्त्रिभ्रुण हत्या एक चिंतन

**प्रा. डॉ. गजानन बाबुराव मरगीळ**
शारदा महाविद्यालय, परभणी
*Corresponding Author-* **प्रा. डॉ. गजानन बाबुराव मरगीळ**
Email id: gajananmargil98@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.7727175**

भारतीय स्त्रीच्या जवीनावर व्यक्तिगत तसेच सार्वजनिक स्तरावरील विविध घकांचा मोठा परिणाम घडून आलेला आहे. प्राचीन काळात स्त्रिला एक विशिष्ट मर्यादेपर्यत स्वातंत्र्य होते मात्र पितृसत्ताक कुटूंब पध्दती रुढ असल्याने त्याचे अनेक परिणाम स्त्रियांना भोगावे लागले. भारतीय समाजात कुटूंबाला मोठे स्थान आहे, मात्र मुलगी जन्माला येणे हे दुर्भाग्याचे लक्षण मानले जाई व आजही तीच परिस्थिती आहे. प्राचीन काळी स्त्रियांच्या कौटूंबिक वर्तनाबाबतही विविध नियम होते. केवळ वरिष्ठ वर्गातील मुलींनाच शिक्षणाचा अधिकार होता. सती, वियोग, जोहार या सारख्या चाली रुढ होत्या.

पिता रक्षती कौमारे, भर्ता रयतियौवने
पुत्र रक्षती वार्धक्य, नस्त्री स्वातंत्र्य मर्हती

अशी स्थिती होती. लहान असतांना वडीलांवर, तरुण असतांना पतीवर व म्हातारे झाल्यावर स्त्रीला अवलंबून रहावे लागत असे. पुत्र प्राप्तीशिवाय इहलोकीचे व परलोकीच कल्याण प्राप्त होवू शकत नाही असा दृढ समज होता. सामाजिक दृष्टया विवाह व अपत्योत्पादन हीच स्त्रि-जीवनाची इतिकर्तव्यता मानली जात होती.

मध्ययुगीन काळात सुलातानांची व मुघलांची सत्ता प्रस्थापित झाल्यावर तत्कालीन हिंदू समाजातील स्त्री-जिवनावर त्याचा मोठा परिणाम झाला. स्वातंत्र्य, हक्क, शिक्षण याबाबतची स्थिती स्त्रियांच्या संदर्भात अधिकच संकुचित झाली. स्त्रीला शिक्षणाचे स्वातंत्र्य नव्हते. बालविवाहाची पध्दती रुढ होती. हुंडा पध्दत प्रचलित होती. राजांच्या दास्यांमध्ये अनेक स्त्रियांचा समावेश असे. मुसलमान स्त्रियांचे जिवनतर अधिकच कष्टप्रद होते.
धर्मशास्त्रकारांनी स्त्रियांना पूर्वी वेदकाळात असलेले धार्मिक अधिकारी काढून घेतले. स्त्रिची तुलना पुरुषा बरोबर होऊ शकणार नाही. यावर स्मृतीग्रंथकारांनी भर दिला. मात्र संत कवियित्रिनी तत्कालीन अनिष्ठ रुढी पंथावर प्रहार करुन स्त्रियांनी आत्मोन्नती व आत्मविकासासाठी प्रोत्साहन दिले. महदंबा, बहिणाबाई, संत जनाबाई, मुक्ताबाई इत्यादीनंी या संदर्भात मोठे योगदान दिले.
18 व्या शतकातील स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान होते. विधवांची स्थिती तर खुपच दयनीय होती. त्यांना केशवपन करावे लागे. विशिष्ट जातीतिल स्त्रियांना पूर्नविवाहाचा अधिकार होता. भारतात ब्रिटिशांनी आपली सत्ता प्रस्थापित केल्यावर ज्या सुधारणा केल्या जी धोरणे राबविली त्यांचा भारतीय स्त्रिजिवनावरही परिणाम झाला. स्त्रिजिवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोण बदलला. स्त्रियांच्या विकासात उपयुक्त असे अनेक कायदे सांगता येतील. स्त्रि पुरुष समानता विचार रुजू लागला. राजा राममोहन रॉय, इंश्वरचंद विद्यासागर, बाळशास्त्री जांभेकर, मा. ज्योतिबा फुले, स्वामी दयानंद सरस्वती आदींनी स्त्रियांचे शिक्षण, अनिष्ठ प्रथा निर्मुलन व स्त्री जीवन सुधारण्यासाठी मोठे प्रयत्न केले. स्त्रि शिक्षणासाठी मोठी चळवळ उभारण्यात आली. सावित्रीबाई फुले, पंडीता रबाबाई, रमाबाई रानडे,र.धो.कर्वे आदिंनी मोठे कार्य केले. पण ही परंपरा स्वातंत्र्योत्तर काळात टिकली नाही. 16 व्या शतकात जिजाउंच्या आईने मुलगी व्हावी म्हणून नवस केला व मुलगी जन्माचा आनंदोत्सव व साजरा केला होता. ही लक्षात घेण्यासारखी बाब आहे. पण आज सुध्दा समाजामध्ये मुलीचा जन्म म्हणजे आपत्ती समजली हात आहे.

लखुजीरांवाना मुलगी व्हावी म्हणोनी
म्हाळसाराणीनं बहु केले नवस
जगदंबे कृपेने झाली मुलगी राणीला.

आधुनिक तंत्रज्ञानाचा गैरवापर वैद्यकीय व्यवसायात मोठया प्रमाणात होऊन स्त्रीचा उदरात असणा-या गर्भांचे लिंग-निदान सोनोग्राफि मशिनच्या साहाय्याने करुन स्त्री लिंग गर्भ असणा-या गर्भास काढून टाकण्याची

पध्दत सर्रास अवल्ंबिली जात आहे. हा खून नव्हे काय? आणि तो करणारे कोण तर जन्मदातेच! इतके क्रोर्य व इतकी अमानुषता आज चालू आहे.

लखुजीरांवाना मुलगी व्हावी म्हणोनी
म्हाळसाराणीनं बहु केले नवस
जगदंबे कृपेने झाली मुलगी राणीला.

आधुनिक तंत्रज्ञानाचा गैरवापर वैद्यकीय व्यवसायात मोठया प्रमाणात होऊन स्त्रीचा उदरात असणा-या गर्भांचे लिंग-निदान सोनोग्राफि मशिनच्या साहाय्याने करुन स्त्री लिंग गर्भ असणा-या गर्भास काढून टाकण्याची पध्दत सर्रास अवल्ंबिली जात आहे. हा खून नव्हे काय? आणि तो करणारे कोण तर जन्मदातेच! इतके क्रोर्य व इतकी अमानुषता आज चालू आहे.

स्त्रीभृण हत्येचे वाढते प्रकार हा समाज शास्त्रज्ञांच्या व चिारवंताच्या चिंतेचा विषय बनला आहे. मुलीची गर्भातच हत्या होण्याच्या प्रकारामुळे समाजातील स्त्री पुरुष प्रमाणात मोठा असमतोल निर्माण होत आहेच पण त्याचे सामाजिक दृष्टया अनेक दुष्परिणाम संभवताना दिसत आहेत. म्हणून या गोष्टीवर कायदयाने बंदी आणावी अशी मागणी झाली. त्यानुसार सरकारने गर्भलिंग परिक्षण बदंी कायदा संमत्त केला हा कायदा मोडणा-या किंवा त्यातील तरतूदीचे उल्लंघन करणा-या व्यक्तीस तुरुंगवास व आर्थिक दंडाच्या शिक्षेची तरतूद आहे पण आज देखिल अनेक खाजगी इस्पितळे व दवाखाने कायदयाचे उल्लंघन करुन गर्भलिंग चाचण्या करीत असतात. ही दुर्दैवी बाब आहे.

आजच्या प्रत्येक माता-पित्याने जिजाऊच्या माता-पित्याचा आदर्श घ्यायला हवा. लिंग भेद करण्याची मानसिकता त्याज्य ठरवायला हवी. कारण स्त्रिभ्रृण हत्या ही भारतीय संस्कृतित कुठेच बसणारी नाही. मुलीच्या गर्भाला जन्माला येण्यापूर्वी चेंदामेंदा, चिरडून टाकणं, निर्दयपणे अन्याय असमानता अत्याचार आणि अवैध कृत्य करण्यापासून पालकांना रोखण्याची गरज आहे. जिजाऊंच्या जन्माच स्वागत ज्या प्रमाण झाल तसं भाग्य जन्माला आलेल्या प्रत्येक मुलीला लाभल पाहिजे.

**संदर्भग्रंथ -**

1. प्रा.डॉ.पाटील व्ही.बी.मानवी हक्क, के.सागर पब्लीकेशन पुणे.
2. प्रा. मोरे दिनेश, शिवरायांची स्त्री विषयक दृष्टीकोन, चिन्मय प्रकारश, औरंगाबाद
3. डॉ. लिला पाटील, शिवरायांच्या आईसाहेब, विविक पब्लिकेशन, कोल्हापूर.
4. प्रा. गायधनी रं.ना., प्राचिन भारतीय स्त्री जीवन, व्यवस्थापन, ग्रंथनिर्मिती केंद्र, य.च.म. मुक्त विद्यापीठ नाशिक.
5. प्रा.डॉ.महाजन टी.टी., मध्ययुगीन भारतातील स्त्री-जीवन, व्यवस्थापन, ग्रंथनिर्मिती केंद्र, य.च.म. मुक्त विद्यापीठ नाशिक.
6. प्रा.डॉ.सौ.धारणकर सरल,आधुनिक भारतातील स्त्री-जीवन व्यवस्थापन, ग्रंथनिर्मिती केंद्र, य.च.म.मुक्त विद्यापीठ नाशिक.